माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
## प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ९११/२०२२**

**अपिलार्थी, श्री. गोविंद धनराज बोपचे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
तहसिल कार्यालय तिरोडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय तिरोडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०५.२०२४**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७.१२.२०२१ | निरंक | ०८.०२.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २७.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "तहसिल कार्यालयाच्या ताब्यातील विविध जुन्या व नविन नक्कल (प्रमाणित प्रत) फीसची माहिती देऊन त्याचे शासन निर्णय व परिपत्रक या विषयासंदर्भात " माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०८.०२.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ३०.०३.२०२२ रोजी** " माहिती मिळाली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ३०.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १४.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजी दाखल केलेल्या अर्जानुसार माहिती मागितलेली असून तहसिलदार तिरोडा यांच्या कार्यालयाच्या वतीने दिनांक ०८.०२.२०२२ रोजी नायब नाझर, तिरोडा यांचेकडे कलम ६(३) नुसार अर्ज हस्तांतरीत केला आहे. त्यात सदर अर्जावर कलम ७(१) प्रमाणे उचित कार्यवाही करुन अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याविषयी सुचीत केले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०९.०३.२०२२ रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध असलेली माहिती कार्यालयास व्यक्तीश: उपस्थित राहून प्राप्त करुन घेण्याविषयी सुचीत केले आहे. अपिलार्थी यांना प्रत्यक्षात ती माहिती देण्यात आली असल्याचे आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने सुचीत केले असले तरी अपिलार्थी यांनी दिनांक ३०.०३.२०२२ रोजी व्दितीय अपील अर्जात माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी यांना यापुर्वी दिनांक ०९.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुरविण्यात आलेल्या माहितीचा एक संच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १४.०५.२०२४**

जावक क्रमांक ६८६९ दिनांक 23 SEP 2024